# हेअर फंडा!

केसांऐवजी चमकदार डोके ठेवण्याची फॅशन रूढ झाल्यास नवल ते काय.


एखादी हेअरस्टाईल हिट झाली की त्याच्या फिल्मी आवृत्या रस्त्यावर भटकताना दिसतात. इंडस्ट्रीचा शहेनशहा अमिताभ...आनंद, गुड्डी, जंजीर, दिवार, शोले या काळातला आठवा म्हणजे 'गो बॅक टू सेव्हेंटीज' कान झाकणारे केस आणि मोठे कल्ले याला खूपच लोकप्रियता मिळाली. त्यापूर्वी देवसाहेबांचा 'कोंबडा' खूप दिवस आरवत होता. सुपरस्टार राजेश खन्नाच्या स्टाईललाही अनेक 'पुष्पा' भाळल्या. नंतरच्या काळात राकेश रोशनचे (की त्यांच्या विगचे) लांब केसही लोकप्रिय झाले होते म्हणे.

बॉलिवूडच्या बादशाहाचा- शाहरुखचा काळ सुरू झाला तेव्हा बाजीगरमधील शाहरुखची केशभूषाही अनेकांना बाजीगर असल्याचा फील देऊन गेली. त्यानंतर मात्र प्रदीर्घ काळाने तीन-चार वर्षांपूर्वीच्या 'दिल चाहता है' ने तरुणाईला केशभूषा बदलायला भाग पाडले. स्पाईक आणि तत्सम प्रकारांना 'डीसीएच'ने खूपच लोकप्रियता दिली. (आणि न्हाव्यांचा जोरदार धंदा सुरू झाला) त्यानंतर गल्लोगल्लीचे सलमान 'तेरे नाम हमने किया है जीवन अपना सारा सनम' असा धोशा लावत डोळ्यांवरच्या बटांना मागे सारत आपल्या ऐश्वर्याला शोधताना दिसले. दक्षिणेचा बादशाह रजनीकांत आणि स्वर्गवासी मोगँबो जॉन अब्राहम आणि 'धूम टू' मधील हृतिकच्या स्टाईलचीही अजून चलती आहे. खेळाकडे वळल्यास आपल्या लाडक्या मास्टर ब्लास्टर सचिनचे कर्ली केसही स्टाईल फंड्याचा भाग झाले. फुटबॉल फिव्हरमध्ये बेकहॅमची स्टाईलही गाजली. आता तर आपल्या महेंद्रसिंग धोनीच्या सतत बदलणाऱ्या केशभूषेवर तरुणाई जाम फिदा आहे.

सुभाष घईच्या 'कांदेपोहे' चित्रपटासाठी काम करणारे 'फॅशन फोटोग्राफर आणि मेकअप आर्टिस्ट' अतुल सिधये म्हणाले, "हेअर स्टायलिंगमध्ये ट्रेंड असतात असे म्हणणे तितकेसे योग्य होणार नाही. कारण यात एखाद्या फिल्मी हिरोला कॉपी करणे किंवा सगळीकडे अमुक पद्धतीची 'हेअरस्टाईल' दिसते म्हणून मलाही अशीच करायचीय, असे सर्वसाधारण चित्र आहे. जॉन अब्राहम आणि अर्जुन रामपाल या नायकांचे केस पाहून बरेच जण तसे केस ठेवतात. मात्र त्या नायकांचा 'बिल्टअप'देखील शोभतात, हा विचार होत नाही. 'हेअर स्ट्रेटनिंग आणि रिबाउंडिंग'ची सध्या चलती आहे, असे म्हणता येईल; मात्र 'हेअर स्ट्रेटनिंग'चाही अनेकांना कंटाळा आला आहे. खरेतर प्रत्येकाने स्वतःची आवड जपत आणि मी करेन तो 'स्टाईल फंडा' यानुसार आपले केस ठेवणे जास्त अपिलिंग ठरू शकते.

सध्या इतक्या प्रकारच्या केशभूषा झाल्या आहेत, की प्रत्येक नायक आणि नायिका चित्रपटागणिक त्यात बदल करताना दिसतात. केस रंगविण्याचे फंडही वाढले आहे. डाव्या डोळ्यावर ढळणाऱ्या बटा रंगीत होत आहेत. तेव्हा हा स्टाईल फंडा सतत बदलणारा आणि चित्रपटांच्या प्रभावावर टिकणारा ठरू लागलाय. 'ओल्ड इज गोल्ड' प्रमाणे 'ओम शांती ओम' पुन्हा सेव्हेंटीजची स्टाईल परत आणतोय की कसे...पाहू या.....

■ प्रसाद पवार





-पुरुषांत
य. मात्र, त्यात
र हवा.

# उनकी खुबसुरतीका राज...

सौंदर्य हे स्त्रियांचे सामर्थ्य आणि सामर्थ्य हे पुरुषांचे सौंदर्य, असं म्हणतात. पण ते आता अर्धवट खरं म्हणायला हवं. कारण सध्या अशी काही कार्यक्षेत्रं निर्माण झाली आहेत, ज्यामध्ये स्त्री आणि पुरुष दोघांच्याही सौंदर्याला अधिक महत्त्व आलं आहे. जाहिरात क्षेत्रापासून हवाई कंपन्यांसह स्टार हॉटेलांमध्ये कार्यरत असलेल्या प्रत्येकाची सुंदर दिसणं ही गरज झाली आहे. कलाकारांना सध्या चित्रपटांपेक्षा जाहिरातीतून अधिक उत्पन्न मिळू लागले आहे. कलाकाराच्या अभिनयकौशल्यापेक्षा त्याच्या दिसण्याला महत्त्व आले. आणि म्हणूनच सध्या स्त्री आणि पुरुषांना आपलं सौंदर्य टिकविण्याची आणि ते वाढविण्याची गरज निर्माण झाली आहे. या गरजेतूनच कॉस्मेटिक सर्जरी करून कृत्रिम आणि नैसर्गिक सौंदर्याचा योग्य मिलाफ साधण्याचं प्रमाण वाढलं आहे. विशेषतः नोकरी करणाऱ्या तीस ते चाळीस वर्षं वयादरम्यानच्या स्त्रियांमध्ये हे प्रमाण अधिक आहे.

कॉस्मेटिक सर्जरीचे अनेक प्रकार आहेत. साधारणपणे अधिक वेळ न लागणारी आणि दुष्परिणाम नसलेल्या सर्जरीला स्त्रियांची पसंती असते. एका सर्वेक्षणानुसार मुंबई, बंगळूर, दिल्ली या मेट्रो सिटींमध्ये हे प्रमाण वाढलेले आहेच; पण गेल्या दोन वर्षांपासून पुण्यातही कॉस्मेटिक सर्जरी करून घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. केवळ नोकरी करणारे स्त्री-पुरुषच कॉस्मेटिक सर्जरी करून घेतात, असा तुमचा समज असेल तर तो साफ चुकीचा आहे. यात अनेक उद्योगपती आणि गृहिणींचाही समावेश आहे.

गृहिणी असलेल्या ऊर्मिला शर्मा म्हणाल्या, "वेगवेगळ्या समारंभांना पतीसोबत मला जावं लागतं. काही वेळा मी परदेशातही गेले आहे. त्यामुळे माझ्या चेहऱ्यावरील सुरकुत्या घालविण्यासाठी तीन वर्षांपूर्वी मी ही ट्रिटमेंट घेण्यास सुरवात केली. आफ्टर ऑल ब्यूटी इज ब्यूटी..."

**बोटक्स ट्रीटमेंट...**

- चेहऱ्यावरील सुरकुत्यांवर ही ट्रीटमेंट उपयोगी
- अवघ्या पंधरा मिनिटांत पूर्ण
- तीन ते चार महिने परिणामकारक
- तीनशेपासून दोन हजार रुपयांपर्यंत खर्च
- यात रसायनांचे प्रमाण योग्यच हवे



चेहऱ्यावरील वाढलेल्या सुरकुत्या बोटक्स ट्रिटमेंटद्वारे अवघ्या चोवीस तासांत नाहीशा करता येतात. Clostridium Botulinum नावाच्या बॅक्टेरियाकडून निर्माण केलेल्या Botulinum toxin Type A या रसायनाच्या शुद्ध प्रकारालाच बोटक्स (Botox) म्हणतात. हे एक औषधी उत्पादन आहे. या ट्रिटमेंटमध्ये इंजक्शनद्वारे हे रसायन चेहऱ्यावरील ज्या भागावरच्या सुरकुत्या नाहीशा करावयाच्या आहेत, तेथील मांसल (रक्तवाहिन्यांमध्ये नाही) भागात दिले जाते. अवघ्या पंधरा मिनिटांत ही ट्रिटमेंट पूर्ण केली जाते. त्यानंतर संपूर्ण परिणाम दिसण्यासाठी चोवीस तासांपासून सात दिवसांपर्यंतचा काळ लागतो. नाक अणि गाल यामध्ये दिसणाऱ्या सुरकुत्या, किंवा दोन भुवयांमधील सुरकुत्या, अथवा गालावरील खळीसुद्धा काही वेळा चेहऱ्याच्या सौंदर्यात बाधा आणते. हे सर्व दोष या बोटक्स ट्रिटमेंटद्वारे दूर केले जातात. याने चेहरा अगदी तजेलदार दिसायला लागतो. मात्र ही ट्रिटमेंट तात्पुरत्या स्वरूपाची असून, ती तीन ते चार महिने टिकून राहते. एका वेळी साधारणपणे पाचशे ते दोन हजार रुपयांपर्यंत याचा खर्च येतो. पुन्हा परत त्या सुरकुत्या घालविण्यासाठी ही ट्रिटमेंट घ्यावी लागते. सध्या बहुतेक शहरांमध्ये विविध कंपन्यांचे ब्यूटी क्लिनिक सुरू झाले आहेत. त्या सर्व शाखांमधून ही ट्रिटमेंट केली जाते. परंतु तज्ज्ञ डॉक्टरांकडूनच ही ट्रिटमेंट करून घेणे उत्तम.

कॉस्मेटिक सर्जन डॉ. पराग सहस्रबुद्धे म्हणाले, "सध्या पुण्यात कॉस्मेटिक सर्जरी करून घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. अनेक जण चेहऱ्यावरील सुरकुत्यांबाबत समस्या घेऊन येतात. तेव्हा त्यांना ही ट्रिटमेंट सांगितली जाते. याउलट अनेक स्त्रिया स्वतःच या ट्रिटमेंटची मागणी करतात. पण या ट्रिटमेंटमध्ये रसायनाचा खूप काळजीपूर्वक वापर हवा." कोणत्याही ब्यूटी ट्रिटमेंटमध्ये रसायनाचा अधिक वापर झाल्यास ॲलर्जी किंवा चेहऱ्याच्या पॅरॅलिसिससारख्या परिणामांची शक्यता असते.

■ संभाजी देशमुख